# महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे तौलनिक विश्लेषण

**डॉ.डोंगरे एल.बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर जि.नांदेड. 431802
e-mail ID dongarelb81@gmail.com
Mobile No. 9011813408

महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ व्यक्ती नसून विचारधारा आहे. या दोन्हीही विचारधारांनी संपूर्ण जगाला प्रभावीत केले आहे. भारताच्या जडणघडणीत या दोन्ही विचारांचे मौलिक योगदान आहे. महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे समकालीन होते. महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोघांचीही सामाजिक पार्श्वभूमी भिन्न भिन्न स्वरुपाची आहे. महात्मा गांधी हे प्रस्थापीत समाज प्रतिनिधी आहेत तर डॉ.आंबेडकर हे व्यवस्थेचे बळी आहेत. या दोन्ही विचारांची तुलना करण्याऐवजी साम्य भेदांची मांडणी करण्यात आली आहे. महात्मा गांधी आणि डॉ.आंबेडकर हे दोघेही उच्च शिक्षित असल्यामुळे त्यांची वैचारीक बैठक ही उच्च पातळीची होती. महात्मा गांधी आणि डॉ.आंबेडकर यांच्या विचारांचे विश्लेषण करतांना पाश्चात्य आणि भारतीय अभ्यासकांनी साम्य भेदांचे विश्लेषण केले आहे. काहींनी साम्यता किंवा परस्पर पुरकता मांडली तर काहींनी परस्पर विरोधी विचारांची मांडणी केली. महात्मा गांधी आणि डॉ.आंबेडकर यांच्या विचारातील परस्पर विरोधी मांडणी एलीनार झेलियट, प्रा.एस.एम.दहिवले, गेल ऑमवेट यांनी आपल्या लेखनात मांडल्याचे दिसून येते.

महात्मा गांधी हे भारतीय वर्णव्यवस्थेचे समर्थक होते. शिवाय अस्पृश्यता निवारण करुन हिंदु धर्मावरील कलंक दुर करावयाचा होता. अस्पृश्यता निवारण करण्यासाठी महात्मा गांधीजींनी हरीजन सेवक संघाची स्थापना करुन भारतीय समाजातील अस्पृश्यता निवारण करण्याचा प्रयत्न केला. याउलट डॉ.आंबेडकर हे वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेच्या विरोधात होते. भारतीय समाजातील अस्पृश्यता निवारण करुन जातीव्यवस्था संपणार यावर डॉ.आंबेडकरांचा विश्वास नव्हता तर जाती अंतासाठी डॉ.आंबेडकर यांनी संघर्ष केला. त्यांच्या मते जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता या हिंदु धर्माला अधिक बळकट करीत आहेत. महात्मा गांधीचा हरीजन सेवक संघ आणि अस्पृश्यता निवारणाचा कार्यक्रम हा एक राजकीय रणनितीचा भाग होता. हरीजन हा शब्द वापरुन महात्मा गांधींनी अस्पृश्याप्रती सहानुभूती दाखवली तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना खोटी सहानुभूती नको होती. आम्हाला मानव म्हणून हक्क पाहिजे ही भुमीका डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली. हा वैचारीक मतभेद वर्णव्यवस्था, अस्पृश्यतेबाबत दोघांत दिसून येतो.

महात्मा गांधी हे हिंदु धर्मातील प्रथा, परंपरा, संस्कृती, तत्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. महात्मा गांधी स्पृश्य हिंदु होते तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्य हिंदु होते. डॉ.आंबेडकर हे अस्पृश्य हिंदु असल्यामुळे त्यांचे हक्क, स्वातंत्र्य, सन्मान, प्रतिष्ठा नाकारली होती. डॉ.आंबेडकरांच्या मते तुम्ही जर आम्हाला हिंदु मानत नसाल तर आम्हाला माणसाप्रमाणे सन्मानाने वागवा

अन्यथा आम्हाला हिंदु धर्माचा त्याग करावा लागेल. अशी भुमीका घेतली. शेवटी हिंदु धर्मातील अज्ञान, अंधश्रध्दा, कर्मकांड, प्रथा, परंपरा, जातीव्यवस्था, अस्पृश्यतेला कंटाळून डॉ.आंबेडकर यांनी भारतीय मानवतावादी, बुध्दीवादी, विज्ञानवादी, अहिंसावादी बौध्द धर्माचा स्विकार करुन संपूर्ण भारत बौध्दमय करीन असा संकल्प केला.

महात्मा गांधी यांनी खेडयाकडे चला असा नारा दिला तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शहराकडे चला असा नारा दिला. महात्मा गांधींना ग्रामधिष्ठीत, विकेंद्रित अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामस्वराज्य निर्माण करावयाचे होते. तर डॉ.आंबेडकरांना आधुनिक शहरे शहरीकरण, औद्योगीकीकरण शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक समता आणि सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी राज्य समाजवादाचा पुरस्कार केला.

महात्मा गांधीच्या दृष्टीने जातीव्यवस्थेचा प्रश्न धार्मिक तर डॉ.आंबेडकरांच्या मते तो प्रश्न राजकीय होता. गांधीच्या मते अस्पृश्यता निवारणासाठी अस्पृश्यांना मंदिर खुले करावे, सहभोजन करावे, पाणवठे खुले करुन समाज सुधारणा घडवून आणून जातीव्यवस्था संपुष्टात आणावी असा विचार महात्मा गांधीचा होता. हा गांधींचा विचार डॉ.आंबेडकरांना मान्य नव्हता. जातीव्यवस्था मंदिर, पाणवठे खुली करुन संपणार नाही तर अस्पृश्यांना राजकीय हक्क किंवा राजकीय सत्तेत सहभाग दिल्याशिवाय अस्पृश्यता, जातीव्यवस्था संपणार नाही अशी भुमीका डॉ.आंबेडकर यांची होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अस्पृश्य समाजाच्या विकासासाठी राजकीय हक्क आवश्यक होते म्हणुन त्यांनी गोलमेज परिषदेत उपस्थित राहून ब्रिटिश शासनापुढे अस्पृश्यांची कैफीयत मांडली. ब्रिटिश शासनाने अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाची मागणी मान्य केली होती. परंतु या मागणीस महात्मा गांधी यांनी विरोध केला. या मागणीच्या निषेधार्थ महात्मा गांधी यांनी पुण्याच्या येरवडा तुरुंगात २१

 ISBN : 978-81-922248-8-6

दिवसाचे आमरण उपोषण केले. पंडीत जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, कस्तुरबा गांधी यांनी डॉ.आंबेडकरांचे हृदय परिवर्तन केले. डॉ.आंबेडकर यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनासाठी राजकीय तडजोड मान्य केली. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव जागांची तरतुद मान्य केली.

महात्मा गांधी आणि डॉ.आंबेडकर यांच्या वैचारीक मतभेदाबरोबरच त्या दोघांत वैचारीक साम्यता, परस्परपुरकताही दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या वैचारीक परस्पर पुरकतेची मांडणी गं.बा.सरदार, रावसाहेब कसबे, यशवंत मनोहर, नरहर कुरुंदकर यांनी आपल्या लिखानातून केल्याचे दिसून येते.

महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दोघेही जातीव्यवस्थेच्या विरोधी होते. दोघांचेही ध्येय एकच होते. परंतु त्यांचे मार्ग भिन्न भिन्न होते. अस्पृश्यता निवारणासाठी महात्मा गांधी यांनी विवाह जर आंतरजातीय नसेल किंवा जोडप्यातील एकजण दलित नसेल तर महात्मा गांधी त्या विवाहाला जात नसत. याबरोबरच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जाती निर्मुलनासाठी आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले होते. यावरुन हे स्पष्ट होते की, दोघांच्याही जाती निर्मुलनाबाबतच्या विचाराबाबत साम्यता दिसून येते.

महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे कायद्याचे अभ्यासक होते. महात्मा गांधीमुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना घटना लिहिण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. भारत-पाक फाळणी दरम्यान घटना समितीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सदस्यत्व रद्द झाले होते. तेंव्हा महात्मा गांधी यांच्या सुचनेवरुन पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी त्यांना मुंबई प्रांतातून पुन्हा निवडून देवून घटना समितीवर पाठवले. घटना लिहित असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी तशा प्रकारच्या घटनात्मक तरतुदींचा समावेश राज्यघटनेत केला.

महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोघांनाही भारत हा न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या राजकीय मुल्यांवर उभारला जावा अशी दोघांची भुमीका होती. यावरुन हे दोघेही सामाजिक समता, सामाजिक न्यायाचे समर्थक होते हे स्पष्ट होते.

महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची तुलना करण्याऐवजी त्यांच्या विचारांच्या साम्य-भेदाचा आढावा प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात आला. महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक पार्श्वभूमी भिन्न स्वरुपाची असल्यामुळे विचारामध्ये साम्य-भेद, परस्पर पुरकता किंवा परस्पर विरोध असणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ ते दोघे एकमेकांचे विरोधक होते असे नाही. प्रसंगानुरूप त्यांनी एकमेकांच्या विचाराचे समर्थन आणि विरोधही केल्याचे दिसून येते. महात्मा गांधी आणि डॉ.आंबेडकरांच्या परस्पर संबंधाचे विश्लेषण केल्यास दोघे एकमेकांचे खास मित्र होते हे नाकारता येणार नाही.

**संदर्भग्रंथ :-**

१) मुल्यव्यवस्था गांधी विचार डॉ.पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन, नांदेड.
२) सर्वदर्शी डॉ.बाबासाहेब आंबेडकर डॉ.पी.विठ्ठल, डायमंड प्रकाशन, पुणे.
३) गांधी विचार डॉ.पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन, नांदेड.
४) काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रती काय केले ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्षितीज प्रकाशन, नागपूर.
५) गांधी आंबेडकर संवादाच्या वाटा The wire


ISBN : 978-81-922248-8-6